जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -४५९ दिनांक - ०१/११/२०२४**

युनिट २ गुन्हे शाखा,पुणे शहर

## स्वारगेट परिसरातील मनोरुण, विकलांग, निराधार लोकांसोबत दिवाळी सण साजरा.

गुन्हे शाखा युनिट २ कार्यालय स्वारगेट पुणे येथे मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री.गणेश इंगळे मार्गदर्शनाखाली युनिट २ प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर, अधिकारी व अंमलदार यांनी स्वारगेट एस.टी. स्टॅन्ड परिसरातील मनोरुग्ण, विकलांग, निराधार लोकांना गुन्हे शाखा युनिट २ कार्यालय, स्वारगेट पुणे येथे बोलावण्यात आले त्यांना दिवाळी सणानिमीत्त आपुलकीने विचारपूस करुन सणाचे औचीत्य साधून त्यांचे केस कापुन, अभ्यंगस्नान घालुन,नविन कपडे परिधान करण्यास देवून स्वारगेट पोलीस वसाहतीत असलेल्या पोलीस दवाखान्यात त्यांची वैद्यकीय तपासणी करुन त्यांचेवर उपचार करण्यात आले व युनिट कार्यालयाच्या अधिकारी व अमंलदार यांच्या समवेत दिवाळीचा फराळाचा आस्वाद घेतला सदर उपक्रमाने मनोरुग्ण,विकलांग व निराधार इसमांना कौटुंबीक जिव्हाळाची भावनने ते भारावून गेले.

सदर स्तुत्य उपक्रमाने पोलीस विभागाकडून एक नवीन सामाजीक बांधीलकी जोपासली गेली व सण उत्सवादरम्यान कर्तव्य करीत त्यांनादेखील कुंटुबासोबत दिवाळी साजरी केल्याचा आनंद मिळाला व एका नव्या उपक्रमाचा पायंडा सुरु झाला आहे.